D:\TUR\TLIR letter.doc43

# नगर रचना आणि मुल्य निर्धारण विभाग
## रायगड अलिबाग

जा.क्र.ससंनर-राअ/बि.शे./मौ.ताडवाडी/ता.कर्जत/स.नं.१३/१ब/ १०४९

नगर परिषद जुनी प्रशासकिय इमारत,
लेले चौक, अलिबाग-४०२ २०१.
Email:adtp_alibag@rediffmail.com
फो.नं.०२१४१-२८२१६९
दिनांक ३ /०३/२०१४.

प्रति,
उपअधिक्षक,
भुमी अभिलेख, कर्जत.

विषय :- मौजे ताडवाडी, ता.कर्जत, जि.रायगड येथील स.नं.१३, हि.नं.१ब, क्षेत्र ४२५००.०० चौ.मी. या जागेस सुधारीत निवासी कारणासाठीच्या बिनशेती परवानगी मिळणेबाबत.

संदर्भ :- १) मा.जिल्हाधिकारी,रायगड-अलिबाग यांचेकडील पत्र क्र.मशा/अ-१(अ) व अ-१(ब)/ टो.नं.९२७१/९१०/२०११, दिनांक १३/०६/२०१२

२) या कार्यालयाचे उपअधिक्षक भुमी अभिलेख कर्जत यांना पत्र क्र.ससंनर-राअ/बिशेप/ मौजे ताडवाडी/ता.कर्जत/स.नं.१३/१ब/२११३, दिनांक १७.०५.२०१३.

३) मा.जिल्हाधिकारी,रायगड-अलिबाग यांचेकडील पत्र क्र.मशा/एल.एन.ए-१(ब)/ टो.नं.९११८/२२३७४२/२०१३, दिनांक ११/१२/२०१३.

४) मा.जिल्हाधिकारी,यांचेकडील परिपत्रक क्र.मशा/एलएनए-१(ब)/बिनशेती मोजणी/२०१०, दि.०१.०४.२०१०.

विषयांकित जमिनी कोणत्याही प्रादेशिक योजनेमध्ये समाविष्ट नाही तसेच ती कोणत्याहीं इतर प्रस्तावाने बाधित होत नाही. या व्यतिरिक्त जमिनी नियोजित भुखंड इतर कोणत्याही प्रस्तावाने बाधीत होत नाही किंवा आरक्षित नाही. तसेच अर्जदाराने सादर केलेल्या मोजणी नकाशाप्रमाणे जागेच्या सर्व हद्दी जुळत आहेत.

संदर्भित पत्र क्र.२ अन्वये या कार्यालयाने यापुर्वी उपअधिक्षक भुमी अभिलेख कर्जत यांना बिनशेती मोजणीकामी या कार्यालयाने पाठविलेले होते. त्यानंतर मा.जिल्हाधिकारी,रायगड-अलिबाग यांचे कडील संदर्भित पत्र क्र.३ अन्वये, बिनशेती परवानगी मिळणेकामी या कार्यालयाकडे प्रस्ताव दाखल झाले असून तथापी, अर्जदार यांनी सुधारीत बिनशेती रेखांनास पु:श्च परवानगी मिळणेबाबत या कार्यालयाकडे परवानगी अपेक्षिलेली आहे.

तथापी, मा.जिल्हाधिकारी, रायगड अलिबाग यांचे संदर्भित क्र.४ चे परिपत्रकानुसार अर्जदार यांनी बिनशेतीसाठी कागदपत्र सादर करताना एक जादा संच या कार्यालयाकडे पाठविणेबाबत निश्चित झाले असुन या कार्यालयाच्या सुचनेप्रमाणे व फेरबदलाप्रमाणे रेखांकनाची मोजणी भूमी अभिलेख विभागाकडुन परस्पर करुन घेणेची आहे. त्यानुसार विषयांकित प्रकरणातील रेखांकन सिमांकित करणेसाठी खालील अटीस अधिन राहुन आपल्याकडे पाठविण्यात येत आहे.

शासनाच्या नगर विकास विभागाकडील दि.१०.०२.२०१० चे निर्देश क्र.टिपीएस-१८०८/१२५४/प्र.क्र. १२५७/०८/नवि-१३ अन्वये, आवश्यक होणारे छाननी शुल्क रक्कम रु.५,५००/-, चलन क्र.२७, दि. ०३.०१.२०१४ रोजी स्टेट बँक अलिबाग येथे जमा केलेले आहे.

वरिल वस्तुस्थितीनुसार नियोजित रेखांकन नकाशाची छाननी केली असता रेखांकन नकाशे हे विकास नियत्रंण नियमावलीनुसार नाहीत. त्यामुळे त्याबाबत नकाशावर हिरव्या रंगाने दुरुस्त्या केलेल्या आहेत. सदर रेखांकनासंबंधी मा.जिल्हाधिकारी, रायगड यांना अंतिम रेखांकन बिनशेतीस अभिप्राय देण्याचे आहेत.

१. सदरील जागेलगत यापुर्वी मंजूर रेखांकन असतील तर त्यातील रस्त्यांचा व विद्यमान रस्ते असतील त्यांचा समन्वय घेणे आवश्यक राहील.

२. सिमांकन करुन मोजणी करताना विस्तारित स्वरुपाचे बदल होत असतील तर अशा प्रकरणी या कार्यालयाची पुन:श्च मंजुरी घेणे आवश्यक आहे.

३. विषयांकित रेखांकनाची मोजणी करताना सदरील जागेस उपलब्ध पोच मार्गाची रुंदी मोजणी नकाशावर - नमुद करण्यात यावी. तसेच रस्ता रुंदीकरणाखालील क्षेत्र नमुद करण्यात यावे.

४. जागेवर प्रत्यक्ष सिमांकन व मोजणी करताना,रेखांकनानुसार प्रत्येक भुखंडाची मापे,क्षेत्रफळ,भुखंड क्रमांक व लगतच्या जमिनीतील दर्शविलेला पोच मार्ग (रुंदीसह) तसेच रस्त्याची वळणे, नैसर्गिक जलप्रवाह, इलेक्ट्रीक लाईन इत्यादी सर्व बाबी मोजणी नकाशावर दर्शविणे आवश्यक आहे. तसेच रेखांकनातील रस्ते लगतच्या जमिनीतील अस्तित्वात असलेल्या अधिकृत रस्त्यांचे आखणीशी मिळतेजुळते ठेवणे आवश्यक आहेत.

५. कोणताही नियोजित भुखंड जागेवर १५०.० चौ.मी.क्षेत्रापेक्षा कमी क्षेत्राचा असु नये.

६. खुली जागा व सुविधा क्षेत्रखालील क्षेत्र नकाशावर नमुद केल्यापेक्षा कमी असु नये.

सहायक संचालक नगर रचना
रायगड - अलिबाग

प्रत :- मा.जिल्हाधिकारी,रायगड अलिबाग यांना माहितीसाठी सादर